
ePaper

# सीमावादाबाबत शहांची बुधवारी शिंदे, बोम्मई यांच्याशी चर्चा



|वर्ष - 6 |अंक - 236 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत


- खासदार ब्रिजभूषण सिंहांच्या दौऱ्याचे 'मनसे' स्वागत
- महिला सक्षमीकरणासाठी "पवना थडी"
- राजकारण बाजूला ठेवून तोडगा काढा


www.mahaenews.com | |शनिवार|दिनांक 10 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## राष्ट्रवादी काँग्रेसची अपरिहार्यता :

# विलास लांडेंशिवाय पर्याय नाही !

## शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांची तारेवरची कसरत

**|पिंपरी |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

पिंपरी-चिंचवड शहराची राजकीय नाळ समजलेले आणि शहराच्या राजकारणाची दिशा बदलण्याची क्षमता असलेले अनुभवी नेतृत्व म्हणून माजी आमदार विलास लांडे यांची ओळख आहे. मात्र, संघटनात्मक निर्णय प्रक्रियेत स्थान मिळत नसल्यामुळे लांडे ''एकला चालो रे'' च्या भूमिकेत दिसत आहे. परिणामी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला आगामी महापालिका निवडणुकीत सत्ता मिळवण्यासाठी लांडेशिवाय पर्याय नाही, असे स्पष्ट चित्र आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड राष्ट्रवादीकडून विविध कार्यक्रम- उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मोशी येथे सुरू असलेल्या "योद्धा @83" क्रिकेट स्पर्धेच्या निमित्ताने प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील उपस्थिती लावली. यावेळी माजी आमदार लांडे उपस्थित होते. किंबहुना, लांडे यांच्या सोबतच पाटील कार्यक्रमस्थळी दाखल झाले.

विशेष म्हणजे, क्रिकेट स्पर्धेत जयंत पाटील यांनी थेट बॅट हातात घेतली आणि लांडे यांनी गोलंदाजी केली. लांडेने फेकलेल्या चेंडूवर



पाटलांनी षटकार मारला. सोशल मीडियावर या दोन्ही नेत्यांच्या खेळाची चांगली चर्चा झाली.

जयंत पाटील राष्ट्रवादीचे राज्यातील संघटनात्मक प्रमुख आहेत. त्यांनी शहरात आल्यानंतर प्रोटोकॉलनुसार शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी कार्यक्रमात पुढाकार घेतला पाहिजे. मात्र, लांडे आणि पाटील यांचा सलोखा प्रचंड आहे. त्यामुळे पाटलांचा पिंपरी-चिंचवड दौरा लांडेंच्या उपस्थितीशिवाय पूर्ण होवू शकत नाही.

### विलास लांडेंकडून 2024 ची आतापासून तयारी...

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे आणि माजी आमदार विलास लांडे नाराज आहेत, अशी चर्चा मध्यंतरी जोर धरु लागली होती. त्यानंतर जयंत पाटील यांच्या उपस्थित कार्यक्रमात सहभागी होत लांडेंनी राष्ट्रवादीत सर्व अलबेल असल्याचे संकेत दिले. त्यामुळे २०२४ ला लांडे भोसरी विधानसभा मतदार संघातून निवडणुकीच्या रिंगणात किंवा शिरुर लोकसभेच्या मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत. त्यासाठी महापालिका निवडणुकीत भोसरीतून राष्ट्रवादीचे जास्तीत-जास्त नगरसेवक आपल्या विचारांचे निवडून आणण्यासाठी त्यांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### जुन्या-नव्यांचा मेळ घालण्यात अजित गव्हाणेंची कसरत...

विविध विषयांवर आंदोलन करणारे अजित गव्हाणे आणि टीमचा पिंपरी-चिंचवडमध्ये अपेक्षीत प्रभाव दिसत नाही. राज्यातील सत्तेतून पायउतार व्हावे लागल्यामुळे गव्हाणे यांचा प्रशासनावरील वचक दिसत नाही. संघटनात्मक बांधणीच्या पातळीवर ज्येष्ठांना सोबत घेवून काम करणे अपेक्षीत असताना अद्यापही यश मिळालेले नाही. अपवाद वगळता माजी आमदार विलास लांडे, आ. अण्णा बनसोडे, माजी महापौर संजोग वाघेरे, माजी महापौर योगेश बहल यांच्यासारखे दिग्गज नेते संघटनात्मक कार्यक्रमांत दिसत नाहीत.

# गुजरातच्या विजयाचा भाजपाकडून आनंदोत्सव!

## मतदारांचे मानले आभार : शहर पदाधिकाऱ्यांनी धरला ठेका

**|पिंपरी-चिंचवड |**
**| महाईन्यूज | प्रतिनिधी|**

गुजरात विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने विक्रमी विजय मिळवला. सलग सातव्यांदा मतदारांनी भाजपाला संधी दिली. याबद्दल पिंपरी-चिंचवड शहर भाजपाच्या वतीने आनंदोत्सव साजरा करण्यात आला. मोरवाडी-पिंपरी येथील भाजपाच्या मुख्य जनसंपर्क कार्यालयाबाहेर शहर भाजपाचे पदाधिकारी यांनी पेढे वाटले. तसेच, ढोल-ताशांच्या गजरात आनंद साजरा करण्यात आला. यावेळी संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस विजय फुगे, राजू दुर्गे, मोरेश्वर शेडगे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी महापौर राहुल जाधव, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, संदीप कस्पटे, विशाल वाळुंजकर, विनोद तापकीर, किरण पाटील, राजेंद्र ढवळे, वैशाली खाडे, हनुमंत लांडगे, सुधीर चव्हाण, गणेश ढाकणे, दीपक नागरगोजे, हेमंत देवकुळे, प्रसिद्धी प्रमुख संजय



पटनी, गणेश नखाते, रवी दाभोळे, किशोर गव्हाणे, मुकेश चुडासमा, कोमल शिंदे, कमलेश भरवाल, कैलास सानप,सुरेश गादीया, दिनकर शिंपी, नितीन अमृतकर, दत्ता यादव, कृष्णा नवले, कृष्णा नवले, संजय परळीकर आदी उपस्थित होते.

सरचिटणीस राजू दुर्गे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सशक्त नेतृत्वात देशाची होणारी गतिमान वाटचाल आणि पक्षाच्या सर्व घटकांच्या मेहनतीला मिळालेली पोहोचपावती म्हणजे गुजरातचा निकाल आहे.

### गुजरात सरकारच्या लोकोपयोगी कारभाराचा विजय...

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वावर प्रचंड विश्वास ठेवून गुजरातच्या जनतेने पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टीला निर्विवाद बहुमत दिले. भारताला स्वयंपूर्ण करण्याचा, जगातील सर्वोत्तम देश कऱण्याचा भाजपाचा संकल्प आहे. जनकल्याण योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवल्या जात आहेत. याच निर्धारातून गुजरात सरकार आणि पक्ष संघटनेने केलेल्या अविरत कार्यामुळेच हा मोठा विजय मिळाला आहे, अशी प्रतिक्रिया भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली आहे.

# खासदार ब्रिजभूषण सिंहांच्या दौऱ्याचे 'मनसे' स्वागत!

## विरोध न करण्याची मनसेची भूमिका

पिंपरी ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

उत्तर भारतीयांची माफी मागितल्याशिवाय राज ठाकरेंना अयोध्येत पाऊल ठेवू देणार नाही, अशी आक्रमक भूमिका घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला आव्हान देणारे भाजप खासदार ब्रिजभूषण सिंह यांच्या नियोजित पुणे दौऱ्याला तूर्त विरोध न करण्याची भूमिका शहर मनसे पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे. भारतीय जनता पक्षाबरोबरील वाढती जवळीक, युतीची चर्चा या पार्श्वभूमीवर सावध भूमिका मनसे पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे.

जानेवारी महिन्यात होणाऱ्या 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनासाठी कुस्ती महासंघाचे अध्यक्ष, खासदार ब्रिजभूषण सिंह यांना आयोजक संस्कृती प्रतिष्ठानचे संयोजक, माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी निमंत्रित केले आहे. ब्रिजभूषण सिंह यांनीही निमंत्रण स्वीकारले असून उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अयोध्या दौरा करणार असल्याची घोषणा केल्यानंतर भाजप खासदार ब्रिजभूषण



**जानेवारी महिन्यात होणाऱ्या 'महाराष्ट्र केसरी' कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनासाठी कुस्ती महासंघाचे अध्यक्ष, खासदार ब्रिजभूषण सिंह यांना आयोजक संस्कृती प्रतिष्ठानचे संयोजक, माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी निमंत्रित केले आहे. ब्रिजभूषण सिंह यांनीही निमंत्रण स्वीकारले असून उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अयोध्या दौरा करणार असल्याची घोषणा केल्यानंतर भाजप खासदार ब्रिजभूषण सिंह यांनी राज यांच्या अयोध्या दौऱ्याला विरोध केला होता. उत्तर भारतीयांची माफी मागितल्याशिवाय राज ठाकरे यांना अयोध्येत पाय ठेवू देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला होता. त्यानंतर काही कारणास्तव राज यांनी अयोध्या दौरा रद्द केला होताधेवून माझी भूमिका स्पष्ट करेन, असा सावध पवित्रा यश साने यांनी घेतला आहे.**

सिंह यांनी राज यांच्या अयोध्या दौऱ्याला विरोध केला होता. उत्तर भारतीयांची माफी मागितल्याशिवाय राज ठाकरे यांना अयोध्येत पाय ठेवू देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला होता. त्यानंतर काही कारणास्तव राज यांनी अयोध्या दौरा रद्द केला होता.

भाजप खासदार ब्रिजभूषण सिंह यांचा दौरा निश्चित झाल्यानंतर काय करायचे ते जाहीर केले जाईल, असे मनसे पदाधिकाऱ्यांकडून स्पष्ट करण्यात आले होते. मात्र त्यांच्या नियोजित दौऱ्याला विरोध न करण्याची भूमिका मनसेने घेतली आहे. मनसे नेते वसंत मोरे यांनी ही माहिती दिली. राजकारणात कोणी कोणाचा कायमचा शत्रू नसतो, त्याचप्रमाणे कुस्तीचेही काही नियम आहेत. पराभवनानंतर पैलवान एकमेकांशी हस्तांदोलन करतात, गळाभेट घेतात. महाराष्ट्राच्या या संस्कृतीप्रमाणे ब्रिजभूषण सिंह यांना विरोध करण्यात येणार नाही, असे मोरे यांनी सांगितले.

राज्यातील सत्ता संघर्षानंतर राज ठाकरे यांची भूमिका भाजपला पूरक अशी राहिली आहे. भाजप नेते आणि राज ठाकरे यांच्यात सातत्याने भेटी होत आहेत. सत्तास्थापनेसाठी भाजपबरोबर हातमिळवणी केलेल्या एकनाथ शिंदे गटाबरोबरही मनसेची जवळीक वाढत आहे. आगामी महापालिका निवडणुकीत मनसे युतीमध्ये येईल, अशी चर्चाही होत आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीत एकमेकांना दुखवायचेही नाही आणि जास्त जवळही जायचे नाही, अशी रणनीती मनसेची आहे. निवडणुकीनंतरची सत्ता समीकरणे जुळविण्यासाठी ही भूमिका घेण्यात आली आहे. त्यामुळेच ब्रिजभूषण सिंह दौऱ्याला विरोध होणार नाही, अशी चर्चा मनसेमध्ये आहे.

## शरद पवारांसह राज्य कुस्तीगीर परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे राजीनामे?

पुणे ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।



राज्य कुस्तीगीर परिषदेची मान्यता आणि महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन यावरून मैदानाबाहेर वेगळाच आखाडा रंगला आहे. राज्य कुस्तीगीर परिषदेची संलग्नता टिकविण्यासाठी १९८४ पासून अध्यक्षपदावर असलेल्या शरद पवार यांच्यासह राज्य कुस्तीगीर परिषदेच्या चार पदाधिकाऱ्यांना राजीनामा द्यावा लागल्याचे समजते.

गेल्या महिन्यात उच्च न्यायालयाने बाळासाहेब लांडगे यांची संघटना अधिकृत असल्याचे सांगितले होते. त्याच वेळी भारतीय कुस्ती महासंघाने नवा डाव खेळताना राज्य कुस्तीगीर परिषदेची संलग्नता रद्द का करू नये, अशा आशयाची कारणे दाखवा नोटीस राज्य कुस्तीगीर परिषदेला दिली. या नोटिशीनंतर राज्य कुस्तीगीर परिषद आणि भारतीय कुस्तीगीर महासंघ यांच्यात केवळ पत्रव्यवहार चालू असल्याचे समजते. या दरम्यान राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक तत्त्वांनुसार वयाची ७० वर्षे पूर्ण केलेल्या राज्य कुस्तीगीर परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. राज्य कुस्तीगीर परिषदेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत गेल्या आठवड्यात बारामती हॉस्टेलवर झालेल्या बैठकीत हा निर्णय झाल्याचे समजते. यानुसार शरद पवार, नामदेव मोहिते, बाळासाहेब लांडगे, सुरेश पाटील या चौघांनी राजीनामा दिला. अर्थात, यावर अधिकृतपणे कुणीही बोलण्यास तयार नव्हते. बाळासाहेब यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

पुणे : महाराष्ट्राच्या कुस्ती विश्वातील सर्वात प्रतिष्ठेच्या असणाऱ्या ६५ व्या 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धेचे आयोजन करण्याचा मान 'संस्कृती प्रतिष्ठान'ला मिळाला आहे. या संदर्भात कुस्ती स्पर्धेच्या आयोजनाची अधिकृत जबाबदारी संस्कृती प्रतिष्ठानला दिल्याचे पत्र भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष, खासदार ब्रिजभूषण सिंह यांच्याकडून स्वीकारल्याची माहिती संयोजक माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांनी दिली. स्पर्धेच्या तारखा आणि ठिकाण लवकरात लवकर कळवण्याची सूचना या पत्रात कुस्ती महासंघाने केली आहे.

### 'महाराष्ट्र केसरी' हंगामी समितीकडेच

**राज्य कुस्तीगीर परिषदेची मान्यता टिकविण्यावरून झालेल्या राजीनामा नाट्यानंतरही भारतीय कुस्तीगीर महासंघाने राज्य कुस्तीगीर परिषदेचा कार्यभार हंगामी समितीकडेच सोपविला असून, त्यांनी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या यजमानपदाचा मान माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांच्या संस्कृती प्रतिष्ठानला दिल्याचे जाहीर केले. ही स्पर्धा पुढील वर्षी जानेवारीत पुण्यात होईल, असे मोहोळ यांनी सांगितले.**

# संक्रातीची सुगडी बनविण्याला यांत्रिकीकरणाची जोड उत्पादनात मोठी वाढ

पारगाव ।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

अवसरी बुद्रुक आंबेगाव येथील कुंभारवाड्यातील कुंभार कारागिरांनी पारंपारिक पध्दतीने संक्रातीची मातीची सुगडी बनविण्याच्या व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली असुन पाच कुटुंबानी विजेवर चालणार्या यंत्रावर सुगडी बनविण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. या सर्व कुटुंबातून सुमारे अडीच लाखाहून जास्त सुगडी तयार होणार असून सुगडी बनविण्याच्या कामाला



वेग आला आहे.

संक्रांत सण सव्वा महिन्यावर आला आहे येथील कुंभारवाड्यात तयार होणार्या संक्रातीच्या मातीच्या सुगड्यांना जिल्ह्यातुन मागणी असते गेली एक महीन्यापासुन सुगडी बनविण्याच्या कामाने वेग घेतला आहे. पारंपारिक लाकुड व सिंमेटपासुन बनविलेल्या चाकावर सुगडी बनवताना चाक फिरवताना जास्त कष्ट पडत होते. यामध्ये हात दुखुन यायचा कामही कमी व्हायचे त्यामुळे येथील कुंभार कारागिरांनी विजेवर चालणार्या मोटारीवरील चाकावर सुगडी बनविण्यास सुरवात केल्याने उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. हे यंत्र प्रत्येकी २५ ते ३० हजार रुपयांना पडले आहे.

**संक्रांत सण सव्वा महिन्यावर आला आहे येथील कुंभारवाड्यात तयार होणार्या संक्रातीच्या मातीच्या सुगड्यांना जिल्ह्यातुन मागणी असते गेली एक महीन्यापासुन सुगडी बनविण्याच्या कामाने वेग घेतला आहे. पारंपारिक लाकुड व सिंमेटपासुन बनविलेल्या चाकावर सुगडी बनवताना चाक फिरवताना जास्त कष्ट पडत होते. यामध्ये हात दुखुन यायचा कामही कमी व्हायचे त्यामुळे येथील कुंभार कारागिरांनी विजेवर चालणार्या मोटारीवरील चाकावर सुगडी बनविण्यास सुरवात केल्याने उत्पादनात मोठी वाढ झाली आहे.**

पुर्वी चाकावर एक कारागीर दिवसाला ६०० ते ७०० सुगडी बनवायचा आता तो यंत्राच्या साह्याने दिवसाला एक हजारहून जास्त सुगडी बनवत आहे. या पीढीजात पारंपारिक व्यवसायाला व्यावसायिक स्वरुप देत संपुर्ण पुणे जिल्ह्यात सुगड्यांना ठोक स्वरुपात ग्राहक शोधण्याचे काम केले व्यापार्यांकडुनही चांगला प्रतीसाद मिळाला. खेड, जुन्नर, शिरुर, मावळ याच बरोबर पुणे व पिंपरी चिंचवड शहरातुन सुगड्यांच्या मागणीची आगाऊ नोंदणी झाली असल्याची माहिती कारागीर शंकर चव्हाण यांनी दिली. संपुर्ण कुंभार वाड्यातुन या संक्रातीला अडीच लाख सुगडी तयार होतील मातीचे दर वाढल्याने मागील वर्षाच्या तुलनेने सुगड्यांच्या दरात वाढ झाली आहे

# महिला सक्षमीकरणासाठी “पवना थडी”!

## महापालिका प्रशासनाची तयारी : बचत गटांना एकूण 400 स्टॉल देणार

पिंपरी ।
। महाईन्यूज ।

महिला बचत गटाने उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी महापालिकेच्या वतीने सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी.मैदानावर दि १६ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२२ या कालावधीत पवनाथडी जत्रा आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्राची संस्कृती व शहराच्या परंपरा यांची सांगड घालून या जत्रेमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.



पवनाथडी जत्रेत वस्तू विक्री व प्रदर्शनासाठी स्टॉल उपलब्ध व्हावेत यासाठी बचत गटांच्या प्रतिनिधींनी महापालिकेकडे अर्ज सादर केले असून सुमारे आठशे बचत गटांना स्टॉल्स उपलब्ध करून देण्याचे नियोजन महापालिका प्रशासनाने केले आहे. मर्यादेपेक्षा अधिक अर्ज आल्यास सोडत पद्धतीने स्टॉल्सचे वाटप करण्यात येणार आहे. यंदा दिव्यांग तसेच तृतीयपंथीयांसाठी देखील काही स्टॉल्स राखीव ठेवण्यात आले असल्याचेही आयुक्त सिंह यांनी सांगितले.

महापालिकेच्या वतीने सन २००७ - ०८ या आर्थिक वर्षापासून पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यास सुरुवात झाली. त्यानंतर दरवर्षी अशाप्रकारे पवनाथडी जत्रा भरवण्यात आली. मात्र, कोविड१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे मागील दोन वर्षात पवनाथडी जत्रेचे आयोजन करण्यात आले नाही. यावर्षी दि. १६ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२२ या कालावधीत सांगवी येथील पी.डब्ल्यू.डी.मैदानावर पवनाथडी जत्रा भरवण्यात येणार आहे.

महिला बचत गट आणि वैयक्तिक महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध व्हावी, महिलांमध्ये विपणन व विक्री कौशल्य विकसित व्हावे यासाठी पवनाथडी जत्रा प्रभावी माध्यम ठरले आहे. यामध्ये महिला बचत गटांसाठी विक्री प्रदर्शनासाठी स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात येतात. सन २००७ मध्ये या स्टॉल्सची संख्या सुमारे तीनशे होती. यावर्षी महापालिकेच्या वतीने सुमारे चारशे स्टॉल उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रत्येक स्टॉलमध्ये दोन बचत गटांना विक्री प्रदर्शनाची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे सुमारे आठशे बचत गटांना स्टॉल्स उपलब्ध होणार आहेत. यामध्ये दिव्यांग आणि तृतीयपंथीयांसाठी स्टॉल्स राखीव ठेवण्यात येणार आहेत. जत्रेमध्ये सहभागी होणाऱ्या महिला बचत गटांना महापालिकेच्या वतीने प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्टॉल्स मध्ये विविध उत्पादित वस्तू, खाद्यपदार्थांची विक्री व प्रदर्शने मांडण्यात आहेत. सुरुवातीला २५ लाख रुपये आर्थिक उलाढाल असलेल्या या जत्रेची उलाढाल सुमारे २ कोटी रुपयांपर्यंत पोहचली आहे, अशी माहिती समाज विकास अधिकारी सुहास बहाद्दरपुरे यांनी दिली.

### दररोज 1 लाख नागरिक भेट देणार...

पवनाथडी जत्रेच्या निमित्ताने विविध शहरातून तसेच महापालिकांमधून समित्या, अनेक मान्यवर जत्रेस भेट देत असतात. तसेच चित्रपट सृष्टीतील अनेक कलाकार, राजकीय नेतेमंडळी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर देखील जत्रेत सहभागी होतात. सलग पाच दिवस चालणा-या या जत्रेमध्ये सुमारे तीन ते पाच लाख लोक भेट देतील असा अंदाज असून दररोज ७० हजार ते १ लाख लोक सहभागी होण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने येणाऱ्या नागरीकांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या वतीने जय्यत तयारी सुरु असून त्याबाबत महापालिका अधिकारी व कर्मचारी यांना विविध जबाबदा-या सोपविण्यात आल्या आहेत, अशी माहिती समाज विकास विभागाचे उप आयुक्त चंद्रकांत इंदलकर यांनी दिली.

### सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन...

जत्रेच्या निमित्ताने महापालिकेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून विविध भागातील पारंपरिक लोककलाकारांना आमंत्रित करण्यात आले आहे. ऑर्केस्ट्रा, नाटक, लावणी, गोंधळ, सनई चौघडा, वाघ्या-मुरळींची जुगलबंदी, महाराष्ट्राची लोकधारा अशा अनेक लोककलांचे सादरीकरण लोककलाकार याठिकाणी करतील. लहान मुलांना विविध आकर्षक व मनोरंजक खेळ खेळण्याची व अनुभवण्याची संधी जत्रेच्या माध्यमातून उपलब्ध होणार आहे. यामुळे नागरिकांना विविध खाद्यसंस्कृतीच्या आस्वादासह मनोरंजनाचीही मेजवानी मिळणार आहे.

# सागर थोरात यांची सामाजिक बांधिलकी

## वाढदिनी सामाजिक उपक्रम : महेश लांडगे यांच्या शिलेदाराची शहरात चर्चा



पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

तरुणाईची प्रचंड क्रेझ असलेले आमदार महेश लांडगे यांचा कट्टर समर्थक असलेले सागर थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त भरगच्च सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

चांगभल प्रतिष्ठानच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवड आणि परिसरात सामाजिक कार्य केले जाते. या प्रतिष्ठानचे अध्यक्ष सागर थोरात आहे. भाजपा शहराध्यक्ष आणि आमदार महेश लांडगे यांचे थोरात निष्ठावंत सहकारी म्हणून ओळखले जातात.

सागर थोरात यांच्या वाढदिवसानिमित्त यंदा विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशमंदिर, नेवाळेवस्ती, चिखली येथे उद्या, दि. १० डिसेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिर घेण्यात येणार आहे. तसेच मोफत मोतीबिंदू निदान व शस्त्रक्रिया शिबीर आणि गरजु रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात येणार आहे.

गहुंजे येथील माई बालभवन आश्रम येथे रविवारी दैनंदिन आवश्यक वस्तुंचे वाटप करण्यात येईल. तसेच सामाजिक बांधिलकी म्हणून संत तुकाराम महाराज यांच्या गाथा मंदिर येथील गोशाळेला गोदान करण्यात येणार आहे. या गोशाळेच्या माध्यमातून धर्मशाळेतील गरजू विद्यार्थ्यांचे संगोपन केले जाते.

### गौतमी पाटीलच्या उपस्थितीमुळे शहरभर चर्चा...

सोशल मीडियावर कमालीची प्रसिद्ध झालेली लावणी कलावंत गौतमी पाटील हिच्या उपस्थितीत दि. ११ डिसेंबर रोजी सायंकाळी कृष्णानगर येथील नूतन शाळा मैदानावर अभिष्ठचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी विशेष वैद्यकीय पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. गौतमी पाटील हिच्या उपस्थितीमुळे सागर थोरात यांच्या अभिष्ठचिंतन सोहळ्याची संपूर्ण शहरात चर्चा रंगली आहे.




## संपादकीय »

# जागे व्हा, अन्यथा परिणाम भोगा!

***पर्यावरणाचा ऱ्हास हा चिंतेचा विषय बनला आहे. बदलते हवामान, तापमान वाढ हे त्याचे द्योतक आहेत. राज्याच्या अनुषंगाने ही बाब अधिकाधिक गंभीर बनत चालली आहे. राज्यातील राजकीय परिस्थितीचा विचार करता, याकडे गांभीर्याने पाहण्यास धोरणकर्त्यांना वेळच मिळत नाही, अशी स्थिती आहे.***

दुसरीकडे जंगल क्षेत्र झपाट्याने कमी होत चालल्याने पर्यावरणाचा धोका पुढील काही वर्षांत येणार होता; तो कदाचित खूप आधीच पाहावा लागेल, असे चित्र आहे.

केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या तज्ज्ञ समितीने २०१३ मध्ये पश्चिम घाटातील सहा राज्यांमधील ५९ हजार ९४० चौरस किलोमीटरचा परिसर 'पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र' म्हणून घोषित केले. परंतु, याला स्थानिक लोक आणि राज्य सरकार यांनी विरोध सुरू केला. हे क्षेत्र कमी करण्यासाठी अनेकांचे आपापल्या पातळीवर प्रयत्न सुरू आहेत. जुलै २०२२ मध्ये याबाबत हालचाली सुरू केल्या गेल्या. याबाबत सूचना, हरकती मागविण्यात आल्या. तज्ज्ञ समितीने ६० हजार चौरस किलोमीटरचा पश्चिम घाटातील परिसर पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र म्हणून निर्देशित केला. केरळ, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तमिळनाडू आणि गोवा या राज्यांनी याला विरोध केला. त्याचा परिणाम म्हणून पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र म्हणून निर्देशित केलेला ६० हजार चौरस किलोमीटरचा परिसर ५६ हजार ८२५ चौरस किलोमीटरवर आणून ठेवला गेला. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग हा पर्यावरणीय दृष्टिकोनातून अत्यंत संवेदनशील टापू आहे. तो वाघ आणि हत्ती यांचा भ्रमणमार्ग आहे. तसेच, जैवविविधतेच्या दृष्टीनेही हा तालुका विशेष महत्त्वाचा आहे; पण इतका संवेदनशील परिसर संवेदनशील यादीतूनच वगळण्याचा पद्धतशीर प्रयत्न आहे. याला कारणही तसेच आहे. या क्षेत्रात खाण क्षेत्र अधिक आहे. असेच हळूहळू प्रकारे सहा राज्यांतील पर्यावरणीय संवेदनशील परिसर कमी करण्याचा घाट सध्या अनेकांच्या अजेंड्यावर आहे. लोकांच्या भावनेशी खेळण्याचा चांगला उद्योग अनेकांना जमतो. यासाठी कदाचित विविध प्रचार अजेंड्याचा वापरही करण्यात येत आहे. यापैकी एक म्हणजे संवेदनशील क्षेत्रात समावेश झाल्यास विकास थांबेल, प्रकल्पांना मान्यता मिळणार नाही, असा गैरसमज लोकमानसावर ठासविण्याचा उद्योग सुरू आहे. राज्यात एकूण १७ हजार ३४० चौरस किलोमीटर क्षेत्र संवेदनशील म्हणून नव्या प्रस्तावात घोषित केले आहे.

# श्वास तर चालू राहू द्या







**'ग्राहक कोणी परके नसून आमचे आधारस्तंभ आहेत. त्यांची सेवा करून आम्ही त्यांच्यावर उपकार करत नाही तर सेवा करण्याची संधी देऊन तेच आम्हाला उपकृत करत आहेत,' हा महात्मा गांधी यांचा संदेश 'महावितरण'ने प्रमाण मानला आहे. पण अशी सेवा करण्यासाठी महावितरणचा श्वास तर चालू रहायला हवा...**

महावितरण अर्थात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी या वीज पुरवठादार कंपनीचा अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम करताना मला सदैव एक कोडे पडते. मला त्याचे उत्तर सापडलेले नाही. तुम्हाला सुचले तर जरूर सांगा. महावितरण वीजबिलाची थकबाकी भरण्यासाठी ग्राहकांना विनंती करते. विनंती करून बिल भरले नाही, तर आग्रह करते. नाही तर वीज तोडण्याची कारवाई करते. त्यावेळी अनेकदा मोठा विरोध होतो. कधी कधी महावितरणच्या कर्मचाऱ्यांवर हल्ला होतो. कारवाई करू नये म्हणून आंदोलने होतात. पण मोबाईलचे बिल भरले नाही म्हणून कनेक्शन थांबविण्याची कारवाई होते, त्यावेळी महावितरणसारखा प्रकार कधीही होत नाही. टीव्हीच्या डीटीएचचे पैसे भरले नाही म्हणून कनेक्शन थांबविले तरीही महावितरणसारखा प्रकार होत नाही. गाडीच्या कर्जाचा हफ्ता भरला नाही म्हणून बँकेने कारवाई केली तरीही कोणी तक्रार करत नाही. मोबाईल फोनचे बिल हफ्त्याने भरण्याची सुविधा द्या किंवा ते कमी करा किंवा ते थेट माफ करा अशी कधी कोणी मागणी करत नाही. त्यासाठी कोणी आंदोलन करत नाही. थकबाकी असूनही मोबाईल कनेक्शन चालू ठेवा म्हणून कोणी मागणी करत नाही. मोबाईल बिलाच्या थकबाकीवरील कारवाईबद्दल कोणाचीच तक्रार नसते पण महावितरणच्या बाबतीत मात्र तक्रार होते, असे का घडत असावे, असे कोडे मला पडले आहे. मला जरूर उत्तर सांगा. मोबाईल फोन ही आवश्यक सुविधा झाली आहे. मोबाईल फोन केवळ संपर्कासाठी नाही तर आर्थिक व्यवहारांसाठी, तिकिटे काढण्यासाठी, मीटिंग करण्यासाठी, करमणुकीसाठी अशा अनेक कामांसाठी आता वापरला जातो. त्यामुळे प्रत्येकाला मोबाईल फोन गरजेचा झाला आहे. पण त्यापेक्षाही अधिक अत्यावश्यक सुविधा वीज आहे. वीजपुरवठा बंद पडला तर सर्व काही ठप्प होईल. मोबाईल फोन चार्जही करता येणार नाही. पाणी पुरवठा, शेती, दिवे, हॉस्पिटलमधील सेवा, वाहतूक अशा अनेक आवश्यक कामांसाठी वीज ही मूलभूत गरज आहे. ती मोबाईलपेक्षाही अधिक महत्त्वाची आहे. तरीही आपण कुटुंबातील चारजणांचे मोबाईलचे बिल विनातक्रार भरतो पण त्यापेक्षा कमी असलेले विजेचे बिल भरण्यास तेवढे उत्साही का नसतो, हा प्रश्न आहे. महावितरण ग्राहकांना विजेचे बिल भरायला सांगते त्यावेळी फक्त वापरलेल्या सेवेचेच पैसे मागत असते. तुम्ही जी वीज वापरली नाही त्याचे बिल भरायला कधीही सांगितले जात नाही. एखादी सुविधा वापरली तर त्याचे बिल दिले पाहिजे, हे तर सर्वांनाच मान्य आहे. घरगुती ग्राहक आणि शेतकरी यांना महावितरण वापरलेल्या विजेचे बिल मागते त्यावेळी त्यांना आधीच खूप सवलत दिलेली असते हे सर्वांनी ध्यानात घ्यायला हवे. राज्यातील सर्व ग्राहकांपर्यंत वीज पोहोचविण्यासाठी महावितरणला सरासरी ७ रुपये ३५ पैसे प्रति युनिट इतका खर्च येतो. पण महावितरण घरगुती ग्राहकांना मात्र सरासरी ७ रुपये ५२ पैसे प्रति युनिट दराने वीजपुरवठा करते. म्हणजे केवळ सतरा पैसे अधिक दराने. घरगुती ग्राहकांचा हा सरासरी दर आहे, प्रत्यक्षात कमी वीज वापरणाऱ्या छोट्या कुटुंबांना यापेक्षा कमी दराने वीज दिली जाते. शेतकऱ्यांना केवळ दीड रुपया प्रती युनिट दराने वीजपुरवठा केला जातो. म्हणजे शेतकऱ्यांना मूळ खर्चाच्या ऐंशी टक्के सवलत दिली जाते. मीटरने वीजपुरवठा होतो, त्या शेतीपंपांसाठीचा हा दर आहे. मीटर नसेल तर कृषी पंपांना प्रती हॉर्सपॉवर दर महिना २६६ रुपये द्यावे लागतात. घरगुती ग्राहकांनी वीजबिल भरले नाही किंवा शेतकऱ्यांचे वीजबिल थकीत असेल तर वसुली करणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांना विरोध करताना सर्वांनी ही सवलत ध्यानात घ्यावी. राज्यात सध्या थकीत विजबिलांच्या वसुलीचा विषय चर्चेचा झाला आहे. सध्या महावितरणची वीजबिलांची एकूण थकबाकी ७३ हजार ३६१ कोटी रुपये आहे व त्यापैकी कृषी क्षेत्राची थकबाकी ४८ हजार ५४२ कोटी रुपये आहे.

# शब्दकोशाची 'महाशक्ती'!

**घरोघरी असूनही दरवर्षी दोन-तीनदा तरी जगभरच्या अनेक देशांत बातमीचा विषय होणारं, जाड-बारीक विविध परींच्या नाना आवृत्त्या जुन्याच तरीही उपयुक्त असणारं असं पुस्तक म्हणजे ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी- 'ओईडी' हे तिचं आद्याक्षरांनुसार होणारं लघुरूप अनेक पुस्तकांच्या तळटीपांपासून, पुस्तकविक्या दुकानांपर्यंत अनेक ठिकाणी वाचता येतं किंवा ऐकू येतं.**

घरोघरी असूनही दरवर्षी दोन-तीनदा तरी जगभरच्या अनेक देशांत बातमीचा विषय होणारं, जाड-बारीक विविध परींच्या नाना आवृत्त्या जुन्याच तरीही उपयुक्त असणारं असं पुस्तक म्हणजे ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी- 'ओईडी' हे तिचं आद्याक्षरांनुसार होणारं लघुरूप अनेक पुस्तकांच्या तळटीपांपासून, पुस्तकविक्या दुकानांपर्यंत अनेक ठिकाणी वाचता येतं किंवा ऐकू येतं. प्रत्यक्षात ही 'ओईडी' आजच्या गूगलच्या जमान्यात कालबाह्य व्हायला हवी होती, पण ऑक्सफर्डचाच काय, केम्ब्रिज किंवा अमेरिक वेबस्टर यापैकी कुठलाही खानदानी शब्दकोश इतिहासजमा झालेला नाही. यांपैकी वेबस्टर्स या सर्वात जुन्या डिक्शनरीचा जन्म १८२८चा. ऑक्सफर्ड डिक्शनरीची छपाई सुरू झाली १८८४ मध्ये. आजवर तिच्यात असलेल्या शब्दांपैकी फक्त २१,८०० शब्दच सन १५७६च्या आधीचे




आहेत. म्हणजे आपल्या मराठीत ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ साकारणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या जन्मानंतरच्या ३००व्या वर्षीसुद्धा इंग्रजीत एवढेच शब्द होते! त्यानंतर मात्र इंग्रजीची शब्दसंपदा वाढत गेली, असं 'ओईडी' सांगते. आजघडीला या 'ओईडी'च्या खंडांमध्ये सहा लाख शब्द आहेत. फक्त २०२२ पुरतंच सांगायचं, तर यंदाच्या जूनमध्ये ७०० आणि सप्टेंबरात ६५० नवे शब्द या डिक्शनरीत आले. या ७०० किंवा ६५० पैकी बरेच निव्वळ बोलीतले (सहसा लिहिले न जाणारे) होते, त्यातही एकसंध शब्द कमी होते आणि शब्दप्रयोग जास्त होते.. उदाहरणार्थ 'हायब्रिड वर्क' या शब्दांपैकी हायब्रिड – संकरित, वर्क- कार्य, काम हे दोन्ही शब्द आधीपासून आहेतच, पण 'हायब्रिड वर्क' हा शब्दप्रयोग म्हणून करोनाकाळापासून नव्यानंच वापरला जातो आहे, याची दखल 'ओईडी'नं घेतली. या जून- सप्टेंबर शब्दसंपदेच्या बातम्या त्या-त्या वेळी आल्याच, पण आता बातमी आहे ती 'या वर्षीच्या शब्दा'ची. 'गॉब्लिन मोड' हा शब्द 'ओईडी'नं २०२२ चा शब्द म्हणून निवडलाय, हे एव्हाना बऱ्याच जणांनी कुठेतरी बातम्यांमध्ये वाचलं/ ऐकलं असेल.

'गॉब्लिन मोड'च्या आदल्या वर्षीचा – २०२१ सालचा शब्द होता 'व्हॅक्स'. हे लस या अर्थानं वापरल्या जाणाऱ्या 'व्हॅक्सीन'चं लघुरूप. त्याच्या आदल्या वर्षी मात्र 'ओईडी'कर्त्यांनी शब्दच निवडला नव्हता. सरतं वर्ष जगासाठी नेमकं कसं होतं, कशाचा प्रभाव जगावर दिसला, याचं प्रतिबिंब अनेकदा या दर वर्षीच्या

## ॥ अभंगवाणी ॥



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# नवी मुंबईत सर्वसुविधायुक्त महसूल भवन उभारणार!

## महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची घोषणा



। मुंबई । महाईन्यूज ।

महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा असून हा विभाग अधिक सक्षम करण्यासाठी येत्या काळात प्रयत्न सुरु आहेत. याचदृष्टीने महसूल विभागासाठी महत्त्वपूर्ण आणि आवश्यक असे सर्वसुविधायुक्त भव्य महसूल भवन नवी मुंबईत उभारण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांनी केली.

कोकण विभागीय महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन 9 ते 11 डिसेंबर दरम्यान चेंबूर येथील राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझर मैदान येथे आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धांचे उद्घाटन आज सकाळी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, कोकण विभागाचे अपर आयुक्त किशन जावळे, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी निधी चौधरी, मुंबई जिल्हाधिकारी राजीव निवतकर, ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके, राष्ट्रीय केमिकल फर्टीलायझरचे कार्यकारी संचालक अनिल माथूर, बार्कचे मुख्य वास्तुविशारद श्री.नागराज, पोलिस उपायुक्त अजय बन्सल यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महसूल विभाग गतीमान करताना आपल्या अधिकारी आणि कर्मचारी यांना चांगल्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याला प्राधान्य असणार आहे. महसूल विभागासाठी महत्वपूर्ण आणि आवश्यक असे सर्वसुविधायुक्त महसूल भवन नवी मुंबईत उभारण्यात येणार असून यासंदर्भातील बैठक पुढील आठवड्यात नवी मुंबईत घेण्यात येईल, असे महसूल मंत्री श्री. विखे पाटील यांनी सांगितले. तसेच महसूल विभागासाठी येणाऱ्या काळात याबाबत त्या उपाययोजनांचा अभ्यास करुन त्याबाबतची अंमलबजावणी करण्यात येईल. कोरोना काळात महसूल विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी आरोग्य यंत्रणेसोबत काम करून सामान्य जनतेला दिलासा देण्याचे मोठे काम केले, असेही मंत्री श्री. विखे पाटील यांनी सांगितले.

कोविड महामारीमुळे महसूल क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या नव्हत्या. आता दोन वर्षांनी क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धा आयोजन केल्याने अधिकारी कर्मचाऱ्यांना आपले कला गुण दाखवण्याची संधी मिळाली. या स्पर्धांमुळे पुन्हा नव्याने चांगले काम करण्याची ऊर्जा मिळेल, असेही महसूलमंत्री श्री. विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.

## राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना हटवण्यासाठी इस्लामपुरमध्ये बंद

। सांगली । महाईन्यूज ।



छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची हकालपट्टी करावी या मागणीसाठी शुक्रवारी इस्लामपुरमध्ये बंद पाळण्यात आला. बहुजन महापुरूष सन्मान कृती समितीच्यावतीने पुकारलेल्या इस्लामपूर बंदला नागरिकांनीही उत्स्फुर्त पाठिंबा दिल्याने शहरातील अत्यावश्यक सेवा वगळता सर्व व्यवहार ठप्प झाले होते. राज्यपाल कोश्यारी यांनी महाराष्ट्राचे श्रध्दास्थान असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करून अवमान केला आहे. अशा व्यक्तीला राज्यातील सर्वोच्च घटनात्मक पदावर बसण्याचा कोणताही नैतिक अधिकार उरलेला नाही. यामुळे अशा व्यक्तिला तात्काळ पदावरून पायउतार करावे या मागणीसाठी आज इस्लामपूर बंदचे आवाहन करण्यात आले होते.

## सांगली : जिल्ह्यातील ४४७ गावापैकी ३८ गावच्या सरपंचांची निवड बिनविरोधी

। सांगली । प्रतिनिधी । महाईन्यूज ।

सांगली जिल्ह्यातील निवडणूक होत असलेल्या ४४७ गावापैकी ३८ गावच्या सरपंचांची बिनविरोधी निवड झाली असून ग्रामपंचायतीचे ५७० सदस्यही बिनविरोध निवडून आले आहेत. उर्वरित ४०९ गावच्या सरपंच आणि ४ हजार १४६ ग्रामपंचायत सदस्य निवडीसाठी १८ डिसेंबरला मतदान होणार आहे. सांगली जिल्ह्यातील ४४७ ग्रामपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम सुरू असून निम्मा जिल्हा निवडणुकीमध्ये दंग आहे. उमेदवारी अर्ज माघार घेण्याची मुदत



संपल्यानंतर ३८ गावचे सरपंच आणि ५७० सदस्य अविरोध निवडून आल्याचे स्पष्ट झाले. आता सरपंच पदाच्या ४०९ जागासाठी १ हजार १२० तर सदस्य पदाच्या ४ हजार १४६ जागासाठी ८ हजार ६०४ उमेदवार आपले भविष्य अजमावत आहेत.

जिल्हा मध्यवतीर्र् बँकेचे संचालक, भाजपचे युवा नेते राहूल महाडिक यांच्या येलूर गावच्या सरपंच पदासाठी अविरोध निवड झाली आहे. याशिवाय कोळे, चिखली, खुंदलापूर, येवलेवाडी, गार्डी, ढवळेश्‍वर, माधळमुठी, सवाळवाडी, वासुंबे, वाकाईवाडी, गौरवाडी, विठ्ठलवाडी, शिवपुरी, भरतवाडी, तांदूळवाडी, बनेवाडी आदी गावातील सरपंच निवडी अविरोध झाल्या आहेत. शिराळा तालुक्यातील कोकरूड, शिवरवाडी, भैरेवाडी, फुफिरे, चिखल, खुंदलापूर, वाकाईवाडी, शिंदेवाडी, तासगाव तालुक्यातील चिंचणी, कवठेमहांकाळ तालुक्यातील आरेवाडी, कडेगाव तालुक्यातील विहापूर, येवलेवाडी, खानापूर तालुक्यातील गार्डी, ढवळेश्‍वर, माधळमुठी, वासुंबे, धोंडेवाडी, मिरज तालुक्यातील सावळवाडी, जत तालुक्यातील रेवनाळ, शिंगणापूर, पलूस तालुक्यातील पुणदीवाडी, हजारवाडी आदी ग्रामपंचायती अविरोध झाल्या आहेत.

# राज्य विकास कर्ज 2023 ची 8.63 टक्के दराने परतफेड

## वित्त विभागाकडून जाहीर

। मुंबई । महाईन्यूज ।

महाराष्ट्र शासनाने पूर्वी खुल्या बाजारातून उभारलेल्या 8.63 टक्के महाराष्ट्र शासन राज्य विकास कर्ज 2023 ची परतफेड दि.9 जानेवारी 2023 रोजी करण्यात येणार आहे, असे वित्त विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

बँक खात्याच्या संबंधित तपशिलाच्या/इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, 8.63 टक्के



महाराष्ट्र शासन कर्ज, 2023 च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात 20 दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. तसेच रोख्यांच्या मागील बाजूस प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली, असे नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत.

सरकारी प्रतिभूती विनियम, 2007 च्या उप-विनियम 24(2) व 24(3) अनुसार, दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबंधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँकेच्या शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.


रोख्यांची रक्कम प्रदान करण्यासाठी जी ठिकाणे मुखांकित करण्यात आली असतील त्या ठिकाणांखेरीज अन्य ठिकाणी ज्या रोखेधारकांना रक्कम स्वीकारायची असेल, त्या रोखेधारकांनी ते रोखे नोंदणीकृत व विमाबध्द डाकेने संबंधित लोक ऋण कार्यालयात पाठवावेत, लोक ऋण कार्यालय हे, महाराष्ट्र राज्यात शासकीय कोषागाराचे काम करणाऱ्या भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या सहयोगी बँकेच्या कोणत्याही शाखेत कोषागारात/उपकोषागारात देय असलेल्या धनाकर्षाव्दारे त्याचे प्रदान करील, असे वित्तीय सुधारणा विभागाचे सचिव शैला ए यांनी कळविले आहे.

# सीमावाद : राजकारण बाजूला ठेवून तोडगा!

## सुप्रिया सुळे यांची अमित शहा यांच्याकडे मागणी

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महाराष्ट्रातील खासदारांनी शुक्रवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. कर्नाटक सीमा वाद, छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह महापुरुषांचा अपमान, राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची वादग्रस्त वक्तव्ये व शिंदे-फडणवीस सरकारचे मौन यासह विविध मुद्द्यावंर खासदारांनी मंत्री अमित शहा यांच्यासोबत चर्चा केली. या सर्व मुद्द्यांवर संवेदनशीलपणे व राजकारण बाजूला ठेवून मार्ग काढावा, अशी मागणी मंत्री शहा यांच्याकडे केल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.**



मंत्री शहा यांनी खासदारांचे म्हणणे ऐकून घेतले. खासदारांनी मांडलेल्या मुद्द्यांवर गुजरातमधील शपथविधी झाल्यावर मार्ग काढला जाईल, असे आश्वासन मंत्री शहा यांनी दिल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले. गुजरात शपथविधीनंतर केंद्रीय मंत्री शहा हे कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत कर्नाटक सीमा वादाबाबत बोलणार आहेत. त्यामुळे केंद्र सरकारच्या दरबारात कर्नाटक सीमा वादावर गुजरात शपथविधीनंतरच तोडगा निघू शकेल, हे स्पष्ट झाले आहे.

या भेटीत महाविकास आघाडीच्या खासदारांनी शिंदे-फडणवीस सरकारबाबत असलेली नाराजी मंत्री शहा यांच्याकडे बोलून दाखवली. शिंदे-फडणवीस सरकार हे विरोधी पक्षाला विश्वासात घेत नाही. कर्नाटक सीमा वादावर महाराष्ट्रातील सरकारने सर्व पक्षीय बैठक बोलवणे अपेक्षित होते. शिंदे-फडणवीस सरकारकारने तसे केले नाही. एवढचं काय तर महाराष्ट्रातील वाहनांवर कर्नाटकमध्ये हल्ला झाला. घटनेला २४ तास उलटून गेले तरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या हल्ल्यावर भाष्य केले नाही, असेही मंत्री शहा यांना सांगितल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

शिंदे-फडणवीस सरकारमधील काही मंत्री हे बेताल वक्तव्य करत असतात. त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. त्यांची पाठराखण केली जाते. तसेच राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान केला आहे. त्यांनी माफी मागितलेली नाही, हेदेखील मंत्री शहा यांना सांगितल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

महाविकास आघाडीच्या खासदारांनी मंत्री शहा यांची भेट घेऊन गाऱ्हाणे घातले असले तरी भाजप सरकारमधील मंत्र्यांवर काय कारवाई होणार व दोन्हीकडे भाजपची सत्ता असलेल्या सीमा वादावर काय तोडगा निघणार हे बघावे लागेल.

# सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांना 30 टक्के आरक्षण

## उत्तराखंड सरकारकडून विधेयक मंजूर



**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

उत्तराखंड विधानसभेने ३० नोव्हेंबर रोजी राज्यातील सरकारी नोकऱ्यांमध्ये स्थानिक महिलांना ३० टक्के 'हॉरिझॉन्टल आरक्षण' देण्याबाबतचं विधेयक मंजूर केलं आहे. उत्तराखंड सरकारने यापूर्वीच २००६ मध्येच स्थानिक महिलांना ३० टक्के आरक्षण देण्याबाबत आदेश जारी केला होता. पण सरकारच्या या आदेशाला उत्तराखंड उच्च न्यायालयात आव्हान दिल्यानंतर या आदेशाला स्थगिती देण्यात आली होती.

अलीकडेच सर्वोच्च न्यायालयाने ही स्थगिती हटवली. त्यानंतर उत्तराखंड सरकारने पुन्हा राज्यातील सरकारी नोकऱ्यांमध्ये स्थानिक महिलांना ३० टक्के 'हॉरिझॉन्टल आरक्षण' देण्याचं विधेयक मंजूर केलं. 'उत्तराखंड सार्वजनिक सेवा विधेयक- २०२२' असं या विधेयकाचं नाव असून हे विधेयक अंतिम स्वाक्षरीसाठी राज्यपालांकडे पाठवण्यात आलं आहे. त्तराखंडमधील महिलांना ३० टक्के आरक्षण देणारं विधेयक काय आहे?

या विधेयकाला मंजुरी देताना राज्य सरकारने म्हटलं की, उत्तराखंडच्या भौगोलिक रचनेमुळे येथील बहुतांशी लोक दुर्गम भागात राहतात. येथील लोकांचं जीवन कठीण असून महिलांची स्थिती वाईट आहे. येथील महिलांची जीवनशैली इतर राज्यातील महिलांच्या तुलनेत कमी दर्जाची आहे. तसेच राज्याच्या सरकारी नोकऱ्यांमध्येही महिलांचं प्रतिनिधित्व फारच कमी आहे. ही तफावत भरून काढण्यासाठी सध्याच्या आरक्षणात महिलांना ३० टक्के 'हॉरिझॉन्टल आरक्षण' देण्याचा निर्णय उत्तराखंड सरकारने घेतला आहे. उत्तराखंडमधील रहिवाशी असणाऱ्या महिलांनाच हे आरक्षण लागू असणार आहे. हे आरक्षण स्थानिक सरकारी संस्थांमधील नोकऱ्यांसाठी आहे. महिलांसाठी राखीव सोडलेल्या जागा भरण्यासाठी पुरेशा महिला उमेदवार उपलब्ध नसतील तर त्या जागांवर गुणवत्तेनुसार पुरुष उमेदवारांची भरती केली जाईल.पण अलीकडेच पवित्रा चौहान, अनन्या अत्री आणि इतर काही महिलांनी सरकारच्या या आदेशाला उत्तराखंड उच्च न्यायालयात आव्हान दिलं. या महिला खुल्या प्रवर्गातील आणि राज्याबाहेरील रहिवाशी होत्या. त्यांनी उत्तराखंडची राज्यसेवा परीक्षा दिली होती. त्यांना पूर्व परीक्षेत उत्तराखंडमधील रहिवाशी असणाऱ्या महिला उमेदवारांच्या 'कट ऑफ'पेक्षा अधिक गुण मिळाले होते. तरीही त्यांना मुख्य परीक्षेसाठी बसण्यास अपात्र ठरवण्यात आलं.त्यामुळे संबंधित महिलांनी सरकारच्या आदेशाला उत्तराखंड उच्च न्यायलयात आव्हान दिलं. उत्तराखंड उच्च न्यायालयाने सरकारच्या आदेशाला स्थगिती दिली. तसेच महिलांसाठी देण्यात आलेलं 'हॉरिझॉन्टल आरक्षण' रहिवाशी प्रमाणपत्र किंवा राहण्याचे ठिकाण विचारात न घेता देण्यात यावं, असं सांगितलं. उच्च न्यायालयाने स्थगितीचा आदेश दिल्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेलं. यावेळी राज्याची बाजू मांडतांना सरकारी वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात सांगितलं, "राज्याची भौगोलिक स्थिती आणि हवामानामुळे उत्तराखंडमधील तरुणांना उपजीविकेच्या शोधात इतरत्र स्थलांतरित व्हावं लागतं. अशा स्थितीत घर चालवण्याची आणि मुलांचे संगोपन करण्याची जबाबदारी महिलांवर टाकली जाते.

### 'हॉरिझॉन्टल आरक्षण' म्हणजे काय?

**कायद्यानुसार ठरवलेल्या प्रत्येक गटासाठी 'व्हर्टिकल आरक्षण' लागू केलं जातं. तर 'हॉरिझॉन्टल आरक्षण' हे नेहमी प्रत्येक 'व्हर्टिकल आरक्षणा'च्या गटासाठी स्वतंत्रपणे लागू केलं जातं. उदाहरणार्थ, जर महिलांना ५० टक्के 'हॉरिझॉन्टल आरक्षण' लागू केलं असेल तर 'व्हर्टिकल आरक्षणा'नुसार निवड झालेल्या एकूण उमेदवारांमध्ये ५० टक्के उमेदवार महिला असतील. म्हणजेच अनुसूचित जाती (SC) या प्रवर्गानुसार निवडलेल्या एकूण उमेदवारांमध्ये निम्म्या उमेदवार महिला असतील. हाच नियम इतरही आरक्षणाला लागू होतो.**

### या आरक्षणाबाबत न्यायालयीन लढा

**जुलै २००६ मध्ये, उत्तराखंड सरकारने परिपत्रक जारी करत महिलांसाठी ३० टक्के 'हॉरिझॉन्टल आरक्षण' लागू केलं. जात, पंथ, जन्मस्थान, मूळ वास्तव्याचं ठिकाण आणि सामाजिक स्थिती विचारात न घेता सरकारने राज्यात राहणाऱ्या सर्व महिलांना ३० टक्के आरक्षण प्रदान केलं. या सरकारी आदेशानुसार उत्तराखंडमध्ये आतापर्यंत महिलांना ३० टक्के आरक्षण देऊ केलं होतं.**

# मुख्यमंत्रीपदाची माळ कुणाच्या गळय़ात?

**। शिमला । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**



हिमाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळवलेल्या काँग्रेस पक्षाकडून मुख्यमंत्रीपदाची माळ कुणाच्या गळय़ात पडणार याविषयी तर्क लावले जात आहेत. प्रदेशाध्यक्ष प्रतिभा सिंह, निवडणूक प्रबंधन समितीचे अध्यक्ष सुखिवदर सिंह सुक्खू आणि ज्येष्ठ नेते मुकेश अग्निहोत्री यांच्यात मुख्यमंत्रीपदासाठी चुरस आहे. कौलसिंह ठाकूर, रामलाल ठाकूर आणि आशाकुमार हे नेतेही मुख्यमंत्रीपदाचे दावेदार मानले जात होते, मात्र या तिघांचाही निवडणुकीत पराभव झाला आहे. माजी मुख्यमंत्री दिवंगत विरभद्र सिंह यांची पत्नी प्रतिभा सिंह या मुख्यमंत्रीपदाच्या प्रबळ दावेदार मानल्या जात आहेत. राज्यातील वरिष्ठ नेते सुक्खू यांना मुख्यपत्रीपदी बसविण्याच्या विरोधात आहेत. प्रतिभा सिंह याच त्यांची पहिली पसंती असल्याचे बोलले जात आहे. मात्र त्या खासदार असल्याने मुख्यमंत्री झाल्यास त्यांना पुन्हा निवडून यावे लागेल. विधानसभेत विरोधी पक्षनेते असलेले मुकेश अग्निहोत्री सलग पाच वेळा निवडून आले आहेत. तेही मुख्यमंत्रीपदाचे प्रबळ दावेदार मानले

> **हिमाचल प्रदेशातील जनादेशाचा विनम्रतेने स्वीकार करतो. हिमाचलमध्ये 'राज' बदलले असले तरी 'रिवाज'ही बदलला आहे. कारण आघाडीच्या दोन पक्षांच्या मतांमध्ये एक टक्क्यापेक्षाही कमी अंतर आहे.**
>
> **- जे. पी. नड्डा, भाजपचे अध्यक्ष**

> **देवभूमी हिमाचल प्रदेशातील जनतेने आमच्यावर विश्वास ठेवत आम्हाला भरघोस मतदान केले. याबद्दल जनतेचे मनापासून आभार. राहुल गांधींच्या 'भारत जोडो यात्रेने'ही या विजयात मोलाची मदत केली. आश्वासने पूर्ण करण्यास पक्ष कटिबद्ध आहे.**
>
> **- मल्लिकार्जुन खरगे, काँग्रेसचे अध्यक्ष**

# डोक्यात हवा गेली', शहनाज गिलवर चाहते भडकले


शहनाज गिल हे नाव आता चांगलचं परिचीत झालं आहे. बिग बॉस 13 नंतर शहनाज गिलला एक नवीन ओळख मिळाली आहे. ती सर्वांची लाडकी आहे. तिचे चाहते तिच्यासाठी काहीही करायला तयार असतात. ती नवनवीन प्रोजेक्ट करतांनाही आहे. सिद्धार्थ शुक्लाच्या निधनांनतर तिला सर्वांनीच सहानभूतीही दिली. मात्र तिचा एक व्हिडिओ सध्या सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. शहनाजच्या नुकत्याच समोर आलेल्या व्हिडिओवर युजर्स हाच तिचा खरा चेहरा असून हिच तिची सत्यता असल्याचं सांगत आहे.

शहनाज गिल आणि रॅपर एमसी स्क्वेअर त्यांच्या गाण्यामूळं चर्चेत आहे. या गोण्याचं प्रमोशन करण्यासाठी दोघ बिग बॉस 16 या रिॲलिटी शोमध्ये गेले होते. पापाराझींने त्यांना सेटबाहेर घेरले. दरम्यान, शहनाज काही त्यांना पोझ देतांना त्याच्याशी उद्धटपणे संवाद साधतांना दिसतेय. ती म्हणते, "अरे, गाण्याचंही प्रमोशन करा." यांना फक्त फोटो हवे आहेत. यानंतर ती एमसी स्क्वेअरला इशारा करत गाणे गायला सांगते. तो घणी स्यानी गाणं गातो आणि शहनाजनेही गाण्यावर डान्स करते. गाणे संपताच शहनाज म्हणते, "ये सगळ कट होऊन जाइल आणि दुसरचं काही दिसेलं. मग पापाराझी तिला सोलो पोज देण्यास सांगतात, त्यावर शहनाज स्क्वायरचा हात धरून बिग बॉसच्या सेटकडे जाते आणि म्हणते, "सोलो का?"



# राणादा-पाठकबाईंच्या लग्नाची क्रेझ काही संपेना

हार्दिक जोशी व अक्षया देवधरच्या लग्नाची क्रेझ अजूनही कायम आहे. अक्षयाचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हार्दिक जोशी व अक्षया देवधर २ डिसेंबरला विवाहबंधनात अडकले. या दोघांच्या लग्नाचे बरेच व्हिडिओ व फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. अजूनही या दोघांच्या विवाहसोहळ्याची चर्चा रंगत आहे. हार्दिक-अक्षयाच्या लग्नाचं क्रेझ काही संपत नाही. अक्षयाचा संगीत कार्यक्रमाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला आहे. या व्हिडिओमध्ये अक्षया हार्दिकसाठी गाणं गाताना दिसत आहे. हार्दिक व अक्षयाने लग्नगाठ बांधत चाहत्यांना सुखद धक्का दिला. या दोघांच्या जोडीला चाहते भरभरून प्रेम देत आहेत. हार्दिकनेही अक्षयासाठी सरप्राईज डान्स केला होता. अक्षयाने हिंदी रोमँटिक गाणं गात हार्दिकला सरप्राईज दिलं.



# टीना दत्ताला मोठा झटका!

रिॲलिटी शो 'बिग बॉस 16' आता जास्तचं मनोरंजक झाला आहे. आता या शोबाबत एक मोठी बातमी समोर येत आहे. घरातील तगडी स्पर्धक टीना दत्ताला या आठवड्यात घरातुन बाहेर जावं लागणार असा दावा करण्यात आला आहे. ती या आठवड्यात नॉमिनेट झालेली होती. तिच्यासोबत निमृत कौर अहलुवालिया, सुंबूल तौकीर खान आणि एमसी स्टॅन यांनाही नॉमिनेट करण्यात आलं होतं.

तेव्हापासूनच टिना दत्ता सोशल मीडियावर ट्रेंड करत आहे. त्यातच बाहेर पडण्याच्या वृत्ताने काहींना आनंद झाला तर अनेकांना दुख झाले. आजच्या वीकेंड का वार मध्ये, सलमान खान टीनाचा क्लास देखील घेणार आहे, ज्यामुळे ती शोमध्ये रडतांनाही दिसणार आहे.

टीना दत्ता बेदखल झाल्याचा दावा मीडिया रिपोर्ट्समध्ये केला जात आहे. दरम्यान चॅनेल किंवा निर्मात्यांकडून याबद्दल अधिकृत घोषणा झालेली नाही. आजच्या एपिसोडच्या प्रोमोमध्ये सलमान खान घराबाहेरच्या गोष्टीवर घरात चर्चा केल्यामूळं टीना दत्ताचा क्लास घेणार आहे. तिला काही प्रॉब्लेम आहे का असं विचारल्यानंतर ती रडते. त्यानंतर ती कन्फेशन रूममध्ये जाते आणि सांगते की ती आता हे नाही करू शकत. दरम्यान, टीनाला बाहेर काढल्याची बातमी ऐकल्यानंतर सोशल मीडियावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया येत आहेत. काही लोक असेही म्हणत आहेत की टीनाला हाकलून दिलं जाणार नाही, तर तिला सिक्रेट रुममध्ये पाठवलं जाऊ शकतं. तर अनेक लोक टीना दत्ताच्या समर्थनातही आहेत. टीनाची अवस्था पाहून त्यांना वाईटही वाटत आहे.

या आठवड्यात बाहेर जाण्यासाठी 4 स्पर्धक नामांकित आहेत. या यादीत टीना दत्ता व्यतिरिक्त निमृत कौर अहलुवालिया, सुंबुल तौकीर खान आणि एमसी स्टेन यांचाही समावेश आहे. टीनाला आता बाहेर काढलं जाईल की आणखी कोणी बाहेर जाईल, हे वीकेंड का वारमध्येच कळेल. तुम्ही कलर्स चॅनल आणि वूट ॲपवर सोमवार ते शुक्रवार रात्री १० वाजता आणि शनिवार-रविवार रात्री ९ वाजता हा कार्यक्रम पाहू शकता.



# शुभांगी गोखले यांचा जुना फोटो शेअर करत सखी गोखलेची आईसाठी खास पोस्ट

अभिनेत्री शुभांगी गोखले यांनी मराठीसोबतच हिंदी मालिका आणि सिनेमांमधून प्रेक्षकांची मोठी पसंती मिळवली आहे. त्या मनोरंजन सृष्टीतील एक बहुआयामी अभिनेत्री म्हणून ओळखल्या जातात. आज त्यांचा वाढदिवस आहे. त्यांची मुलगी अभिनेत्री सखी गोखले दरवर्षी आईच्या वाढदिवस काही ना काही करून स्पेशल करत असते. आता आज तिने आईला वाढदिवसाच्या हटके शुभेच्छा दिल्या आहेत. सखी गोखले ही तिच्या मनमोकळ्या स्वभावाने तिच्या स्पष्टवक्तेपणामुळे चर्चेत असते. सोशल मीडियावर सक्रिय राहत ती विविध



तिच्या चाहत्यांशी संपर्कात राहते. तिच्या आईशी म्हणजे अभिनेत्री शुभांगी गोखले यांच्याबरोबर तिचं खास नातं आहे. ती बऱ्याचदा तिच्या आईबद्दल तिला वाटणारं प्रेम हटके शब्दात व्यक्त करत असते.

# 'मेरा दिल ये पुकारे आजा' फेम पाकिस्तानी तरुणीला विकायचाय तिचा हिरवा ड्रेस

“मेरा दिल ये पुकारे आजा’ या गाण्यावर डान्स करत आपल्या व्हिडिओने इंटरनेटवर धुमाकूळ घातला आहे. या एका व्हिडिओमुळे पाकिस्तानी मुलगी आयशा रातोरात इंटरनेटवर व्हायरल झाली. या आयशाला आता तिच्या व्हायरल हिरव्या कुर्तीचा लिलाव करायचा आहे. तिने या ड्रेसची किंमत ३ लाख रुपये ठेवली आहे. जर तुम्हाला तिचा हा ड्रेस हवा असेल तर तुम्हाला ३ लाख रुपये खर्च करावे लागतील.



‘पीपल मॅगझिन पाकिस्तान’ने दिलेल्या वृत्तानुसार, आयशाने हा ड्रेस तिच्या मैत्रिणीच्या लग्नात परिधान केला होता आणि लता मंगेशकर यांच्या ‘मेरा दिल ये पुकारे’ या गाण्यावर डान्स केला होता. तिचा डान्स व्हिडिओ एका रात्रीत सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. तिने डान्स केलेलं हे गाणं १९५४ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘नागिन’ चित्रपटातील आहे. ते वैजयंतीमाला आणि प्रदीप कुमार यांच्यावर चित्रित करण्यात आलं होतं. या व्हिडिओमध्ये आयशाच्या डान्स स्टाइलने आणि तिच्या साधेपणाने लोकांची मनं जिंकली. तिचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर सोशल मीडियावर तिचे फॉलोअर्स मोठ्या प्रमाणात वाढले. आयशा ही पाकिस्तानमधील प्रसिद्ध टिकटॉकर आहे, तिचे टिकटॉक व्हिडीओज व्हायरल होत असतात. एका न्यूज पोर्टलशी बोलताना आयशाला जेव्हा व्हायरल होत असलेल्या व्हिडीओबद्दल विचारण्यात आले तेव्हा आयशाने सांगितले की, तिच्या बेस्ट फ्रेंडच्या लग्नात तिने हा डान्स केला होता. ती म्हणाली, “मला दुसऱ्या गाण्यावर डान्स करायचा होता, पण माझ्या मैत्रिणीने मला या गाण्यावर परफॉर्म करण्यास सांगितले. माझ्या बेस्ट फ्रेंडचं लग्न होतं, त्यामुळे तिच्या आवडत्या गाण्यावर डान्स केला.

# इंग्लंडने पाकिस्तानविरुद्ध रचला इतिहास !

## पराक्रम करणारा ठरला जगातील पहिलाच संघ

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



पाकिस्तान आणि इंग्लंड संघात तीन सामन्यांची कसोटी मालिका खेळली जात आहे. या मालिकेतील दुसरा कसोटी सामना मुलतान येथे सुरु आहे. बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील इंग्लंड क्रिकेट संघाने शुक्रवारी, पाकिस्तानविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात मैदानात उतरताच इतिहास रचला आहे. २००० आंतरराष्ट्रीय सामने खेळणारा इंग्लंड हा जागतिक क्रिकेटमधील पहिला संघ ठरला आहे.

पाकिस्तान आणि इंग्लंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना मुलतानमध्ये खेळला जात आहे. या सामन्यात इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आहे. मुलतान कसोटीत इंग्लंडची आक्रमक फलंदाजी शैली आतापर्यंत जबरदस्त होती. पहिल्या सत्रात पाहुण्या संघाने ३३ षटकांत ५ गडी गमावून १८० धावा केल्या आहेक. विल जॅक क्रीझवर कर्णधार बेन स्टोक्सला साथ देत आहे. इंग्लंडच्या आंतरराष्ट्रीय सामन्यांबद्दल बोलायचे तर, या संघाने आतापर्यंत १०५७ कसोटी, ७७३ वनडे आणि १७० टी-२० सामने खेळले आहेत. इंग्लंडनंतर सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याचा विक्रम ऑस्ट्रेलियाच्या नावावर आहे. कांगारूंनी आतापर्यंत एकूण १९९५ सामने खेळले आहेत. त्याचबरोबर भारत १७७५ सामन्यांसह या यादीत तिसऱ्या स्थानी आहे. तसेच पाकिस्तान १६०८ सामन्यांसह चौथ्या स्थानावर आहे.

### पदार्पण करणाऱ्या अबरार अहमदने घेतल्या 5 विकेट्स

पाकिस्तान विरुद्ध इंग्लंड दुसऱ्या कसोटी सामन्याबद्दल बोलायचे तर, जॅक क्रॉली आणि बेन डकेट यांनी पहिल्या विकेटसाठी ३८ धावा जोडल्या होत्या. इंग्लिश संघाला क्रॉलीच्या रूपाने पहिला धक्का बसला, तो १९ च्या वैयक्तिक धावसंख्यवर त्रिफळाचित झाला. यानंतर डकेट (६३) आणि ऑली पोप (६०) यांच्यात दुसऱ्या विकेटसाठी ७९ धावांची भागीदारी झाली, पण ते बाद झाल्यानंतर जो रूट आणि हॅरी ब्रूक्स स्वस्तात पॅव्हेलियनमध्ये परतले. या सामन्यात पदार्पण करणाऱ्या अबरार अहमदने इंग्लंडच्या या सर्व ५ विकेट घेतल्या. अबरारने आतापर्यंत १३ षटकात ५.४० च्या इकॉनॉमीसह ७० धावा दिल्या आहेत.

# आयपीएलवर आगपाखड करणारा खेळाडू होणार बीसीसीआय निवड समितीचा अध्यक्ष

नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



भारताचा माजी वेगवान गोलंदाज व्यंकटेश प्रसाद बीसीसीआयच्या निवड समितीच्या नवीन अध्यक्षपदी विराजमान होण्याची शक्यता आहेत. बीसीसीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्य निवड समितीच्या पदासाठी अर्ज केलेल्यांमध्ये व्यंकटेश प्रसाद हे सर्वात कुशल क्रिकेटपटू ठरले आहेत. त्यांच्याकडे लवकरच नव्या निवड समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. बीसीसीआय नवीन समितीमध्ये मुख्य निवडकर्ता म्हणून टी२० तज्ञाच्या शोधात असल्याची चर्चा आहे.

वेंकटेश प्रसाद यांनी आपल्या कारकिर्दीत गोलंदाज म्हणून भारतासाठी ३३ कसोटी आणि १६१ एकदिवसीय सामने खेळले आहेत. त्याच्या खात्यात २९० आंतरराष्ट्रीय विकेट्स आहेत आणि नवीन निवडकर्त्यांच्या पदासाठी अर्ज करणारा तो सर्वात अनुभवी क्रिकेटर आहे. बीसीसीआयच्या जवळच्या सूत्रांवर विश्वास ठेवला तर, या महिन्याच्या अखेरीस नवीन निवड समिती अंतिम केली जाईल आणि त्याची घोषणा केली जाईल. वेंकटेश प्रसाद हा या भूमिकेसाठी अर्ज केलेल्या सर्वात अनुभवी क्रिकेटपटूंपैकी एक आहे. कोणतीही औपचारिक चर्चा झाली नसली तरी निवड समितीच्या अध्यक्षपदी व्यंकटेश प्रसाद यांची वर्णी लागल्याची चर्चा आहे.

# क्रोएशियाविरूद्ध अखेरच्या क्षणी गोल करत नेमारने पेलेंशी केली बरोबरी

नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



फिफा वर्ल्डकपच्या क्वार्टर फायनलमध्ये ब्राझीलच्या स्टार स्ट्रायकर नेमारने क्रोएशियाविरूद्ध गोल करत दिग्गज पेले यांच्या विक्रमाशी बरोबरी केली. नेमारने क्रोएशियाविरूद्ध एक्स्ट्रा टाईममध्ये 15 व्या मिनिटाला गोल केला. या गोलबरोबरच नेमारने ब्राझीलकडून आंतरराष्ट्रीय सामन्यात सर्वाधिक 77 गोल करण्याच्या पेले यांच्या विक्रमाशी बरोबरी साधली.

फिफा वर्ल्डकपच्या पहिल्या क्वार्टर फायनलमध्ये पहिल्या मिनिटापासून आक्रमक चाली रचणाऱ्या ब्राझीलने 90 मिनिटात क्रोएशियावर तब्बल 18 वेळा चढाई केली. त्यातील 8 शॉट्स गोलपोस्टचा अचूक वेध घेणारे होते. मात्र बॉल आणि गोलपोस्टच्या मधी लिव्हाकोव्हिक उभा होता. मात्र सामना एक्स्ट्रा टाईममध्ये नेत प्रतिस्पर्ध्यावर दबाव आणण्यात तरबेज असलेल्या क्रोएशियाने हा सामना देखील एक्स्ट्रा टाईममध्ये नेला. एक्स्ट्रा टाईममध्ये देखील ब्राझीलने दमदार सुरूवात करत क्रोएशियाच्या बचाव फळीला आणि गोलकिपरला चांगलेच कामाला लावले. मात्र जसजसा सामना पुढे सरकत गेला क्रोएशियाने आक्रमक चढाया करत ब्राझीलला टेन्शन देण्यास सुरूवात केली होती. मात्र नेमारने एक्स्ट्रा टाईमचा पहिला हाफ संपायला काही मिनिटे शिल्लक असताना क्रोएशियाची गोलपोस्ट भेदली. त्याने लिव्हाकोव्हिकला चकावा देत ब्राझीलचा पहिला गोल डागला. यानंतर ब्राझीलला सेमी फायनल गाठण्यासाठी फक्त पुढची 15 मिनिटे क्रोएशियाचे आक्रमण रोखून धरायचे होते.

मात्र क्रोएशियाच्या ब्रुनो पेटकोव्हिकने 117 व्या मिनिटाला ब्राझीलवर गोल करत सामना बरोबरीत आणला. जपान प्रमाणे

# एकटा लिव्हाकोव्हिक भिडला

## 5 वेळा विजेतेपद पटकावणाऱ्या ब्राझीलला दाखवला घरचा रस्ता

नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



क्रोएशियाने जपानप्रमाणे ब्राझीलचा सामना देखील पेनाल्टी शूटआऊटमध्ये नेला. हा पेनाल्टी शूटआऊटमधील सामना क्रोएशियाने 4 - 2 असा जिंकत फिफा रँकिंगमधील अव्वल स्थानावर असलेल्या ब्राझीलचे पॅक अप केले. क्रोएशियाचा गोलकिपर डॉमिनिक लोव्हाकोव्हिकने संपूर्ण 90 मिनिटे ब्राझीलचे आक्रमण रोखून धरले. तसेच पेनाल्टी शूटआऊटमध्ये पहिलीच पेनाल्टी आडवत ब्राझीलवर दबाव टाकला. तत्पूर्वी, ब्राझीलचा स्टार स्ट्रायकर नेमारने एक्स्ट्रा टाईमच्या पहिल्या हाफमधील स्टॉपेज टाईममध्ये गोल करत आघाडी घेतली होती. मात्र क्रोएशियाच्या ब्रुनो पेटकोव्हिकने 116 व्या मिनिटाला गोल करत बरोबरी साधली.

फिफा वर्ल्डकपमधीलग पहिला क्वार्टर फायनल सामना गतवेळचे उपविजेते क्रोएशिया आणि फिफा रँकिंगमध्ये अव्वल स्थानावर असलेल्या ब्राझील यांच्यात झाला. राऊंड ऑफ 16 मध्ये क्रोएशियाने जपानविरूद्धचा सामना पूर्णवेळ गोलशुन्य बरोबरीत ठेवला होता. तीच रणनिती क्रोएशियाने ब्राझीलविरूद्ध देखील यशस्वीरित्या वापरली. ब्राझीलने संपूर्ण सामन्यात बॉलवर नियंत्रण ठेवत उत्कृष्ट पासिंगच्या जोरावर क्रोएशियाच्या गोलपोस्टवर दबाव वाढवला. मात्र क्रोएशियाची भिंत लिव्हाकोव्हिकने ब्राझीलच्या आक्रमणाला गोलपोस्ट भेदण्याची संधी दिली नाही. ब्राझीलने 90 मिनिटात क्रोएशियावर तब्बल 18 वेळा चढाई केली. त्यातील 8 शॉट्स गोलपोस्टचा अचूक वेध घेणारे होते. मात्र बॉल आणि गोलपोस्टच्या मधी लिव्हाकोव्हिक उभा होता. एक्स्ट्रा टाईममध्ये देखील ब्राझीलने दमदार सुरूवात करत क्रोएशियाच्या बचाव फळीला आणि गोलकिपरला चांगलेच कामाला लावले. मात्र जसजसा सामना पुढे सरकत गेला क्रोएशियाने आक्रमक चढाया करत ब्राझीलला टेन्शन देण्यास सुरूवात केली होती. मात्र नेमारने एक्स्ट्रा टाईमचा पहिला हाफ संपायला काही मिनिटे शिल्लक असताना क्रोएशियाची गोलपोस्ट भेदली. त्याने लिव्हाकोव्हिकला चकावा देत ब्राझीलचा पहिला गोल डागला. यानंतर ब्राझीलला सेमी फायनल गाठण्यासाठी फक्त पुढची 15 मिनिटे क्रोएशियाचे आक्रमण रोखून धरायचे होते.